शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १०२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मतमोजणी निकालाला ‘सर्वोच्च’ आव्हान

### ५ डिसेंबरला सुनावणी

**मुंबई -** राज्यात नगरपालिका व नगर पंचायतीच्या निवडणुकीची मतदान प्रक्रिया सुरू असतानाच उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाने मतमोजणी लांबणीवर पडली. मतमोजणी प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका आता सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. या प्रकरणी सरन्यायाधीश सूर्य कांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठापुढे उद्या, ५ डिसेंबरला सुनावणी होणार आहे. या याचिकेच्या सुनावणीसह सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहील.

राज्यातील सर्व २८८ नगरपालिका व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २ डिसेंबरला दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर रोजी मतदान संपल्याच्या पुढील अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. राज्यातील २६४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. या ठिकाणी ३ डिसेंबरला मतमोजणी होणार होती. मात्र, सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपालिका व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी २१ डिसेंबर रोजी मतमोजणी करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील काही नगरपालिका व नगर पंचायतची निवडणूक प्रक्रिया आयोगाने पुढे ढकलली होती. ही निवडणूक २० डिसेंबरला होणार असल्याने सर्व निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा २० तारखेला मतदान होणाऱ्या निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याचा युक्तिवाद ऐकून उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्व नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, या आदेशाला आता सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका ४ डिसेंबरला स्वीकारली.

याचिकाकर्ते राजकिरण बर्वे आणि कारंजा येथील ‘एआयएमआयएम’चे प्रदेश उपाध्यक्ष मो. युसूफ पुंजानी यांनी संयुक्तरित्या सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेमध्ये तत्काळ मतमोजणी करण्याची मागणी करण्यात आली असून उद्या त्यावर सुनावणी होणार असल्याची माहिती याचिकाकर्ते मो.युसूफ पुंजानी यांच्यावतीने ड. फिरोज शेकूवाले यांनी दिली. या याचिकेच्या निर्णयावर स्थानिक निवडणुकीच्या मतमोजणीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## मतदार याद्यावरील आक्षेपांची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी - शेख महेमूद

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या निवडणूक कार्यक्रमांतर्गत प्रभागातील प्रारुप मतदार याद्या अद्यावत प्रक्रियेत मतदार यादीतील प्रचंड घोळ उघडकीस आल्याने इच्छुक उमेदवारांनी अनेक तक्रारी केलेल्या आहे. या आक्षेपांची गंभीर दखल निवडणूक महानगरपालिका प्रशासनने घ्यावी. अशी मागणी जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजितदादा) चे अध्यक्ष शेख महेमूद यांनी केली आहे.

शहरातील प्रारुप मतदार याद्यामध्ये झालेली अफरातफर व प्रचंड घोळ समोर आल्याने अनेकांनी प्रभागातील प्रारुप याद्यावर रितसर आक्षेप नोंदविला आहे. दिनांक ०३ डिसेंबर २०२५ पर्यंत आक्षेप नोंदविला आहे. ज्या प्रमाणात लोकसंख्या जितकी आहे तेवढेच मतदारांची संख्या दाखविण्यात आली आहे. तरी काही प्रभागात लोकसंख्येपेक्षा मतदारांची संख्या अधिक दाखविण्यात आली आहे. हा गंभीर प्रकाराची प्रशासनाने दखल घेवुन दुरुस्ती करावी. अशी मागणी श्री. शेख यांनी केली आहे.

प्रभाग क्रमांक ०२ मध्ये १८ हजार ६१७ लोकसंख्या आणि १८ हजार १३९ मतदारांची संख्या दाखविण्यात आली आहे. प्रभाग क्र. १० मध्ये १७ हजार ९५५ लोकसंख्या आणि १८ हजार ४१० मतदार आहे. प्रभाग क्र. १२ मध्ये १५ हजार ९७३ लोकसंख्या आणि १५ हजार ४९४ मतदार आहेत. सदरील तफावत नियमानुसार दुरुस्त करणे गरजेचे असल्याचे श्री. शेख यांनी सांगितले आहे. प्रभागातील मतदार याद्या बाबतीचे आलेले आक्षेपांची शहानिशा करतांना मतदारांना प्रत्यक्ष भेटूनच त्या प्रभागातील मतदार यादी दुरुस्त करण्यात यावी व इतर प्रभागातील आलेली नावे वगळून मुळ प्रभागात ठेवण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

अवैध गोवंश कत्तलीवर पोलिसांचा पहारा

## सहा गोवंशांची सुटका; आरोपी इरफान कुरेशी अटक



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सदर बाजार पोलिसांनी गुरुवारी (दि. ०४) सकाळी केलेल्या धडक कारवाईत कत्तलीसाठी ठेवण्यात आलेल्या तब्बल सहा गोवंशीय प्राण्यांची सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणी इरफान अब्दुल रहीम कुरेशी (वय ३५, रा. भाजीमंडी, मंगळ बाजार, काद्राबाद, जालना) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, जप्त जनावरांची एकूण किंमत रु. १,१६,००० इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

कारवाई कशी उघडकीस आली?

दि. ०४ गुरुवारी सकाळी ७.४५ वाजता पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप यांना गुप्त माहिती मिळाली की चमडा बाजार परिसरातील दोन स्वतंत्र गोडाऊनमध्ये गोवंश कत्तलीसाठी ठेवण्यात आले आहेत. माहितीची खातरजमा झाल्यानंतर लगेचच सानप यांच्या पथकाने पंचांना बोलावून ८.०० वाजता या ठिकाणी छापा टाकला.

छाप्यात काय आढळले?

गोडाऊनमध्ये आरोपी इरफान कुरेशी प्रत्यक्ष उपस्थित आढळला. पंचासमक्ष दोन्ही गोडाऊनची तपासणी केली असता सहा गोवंशीय जनावरे, कत्तलीसाठी लागणारे साहित्य, अशा वस्तू मोठ्या प्रमाणात सापडल्या. त्यानंतर पंचनामा करून सर्व जनावरे सुरक्षा दृष्टीने स्थानिक गोशाळेत सुरक्षित ठेवण्यासाठी जमा करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली. कारवाई करणाऱ्या पथकात पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप, पो.कॉ. संदीप भारती यांच्या देखरेखीखाली पोहेकॉ डिघोळे, डोईफोडे, तडवी, कानडजे, पोकॉ जायभाये यांचा समावेश होता.

जालना शहरात मागील काही दिवसांपासून अवैध गोवंश कत्तलीचे प्रकार वाढत असल्याच्या चर्चा होत असताना, पोलिसांनी केलेल्या या तातडीच्या आणि प्रभावी कारवाईमुळे पुन्हा एकदा या प्रकारांवर अंकुश बसण्याची चिन्हे दिसत आहेत. नागरिकांनीही पोलिसांच्या या जलद आणि काटेकोर कारवाईचे भरभरून स्वागत केले आहे.

युवा आदर्श

### तारतम्य ...

मसालेदार ती पोष्ट
वाचताना वाटे रम्य
उपमर्द होई कुणां
का नसते तारतम्य
सहज करुन जातो
चूक भीषणअक्षम्य
सरळचालले सगळे
प्रवासकरती दुर्दम्य
अति शाहणा मुर्ख
दोघांत इतके साम्य
पश्चात्ताप नाही होतं
इथेचं वाटते वैषम्य
ताणू नये उगाचंच
चूक जडता रे क्षम्य
नको द्यायला चटके
सतावे नीत आजम्य
वापरे कशाला शब्द
अंकुशठेवायं अदम्य
उक्ती अन् कृतीमध्ये
दिसते उगाचं वैधर्म्य
कायमिळे खाजवून
रहस्य असे अगम्य
बदला जरा स्वताला
साधावे कार्य काम्य

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी असताना बांधकाम रोखले; कमिटीचा महापालिकेवर आरोप; समाजात संताप

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील गरिबशाह बजार कब्रस्तान परिसरात गेल्या काही दिवसांपासून तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झालेली असून, गुरुवार दि. ४ रोजी दुपारी ४ वाजता पुन्हा एकदा मोठी धांदल उडाली. संरक्षणभिंतीची डागडुजी सुरू असताना काही व्यक्तींनी अचानक विरोध करीत काम थांबवण्याचा प्रयत्न केल्यामुळे परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

कब्रस्तानची जुनी संरक्षणभिंत कोसळून अनेक भाग उघडे पडल्याने परिसर पूर्णपणे असुरक्षित झाला होता. त्यामुळे कब्रस्तान कमिटीने जिल्हाधिकार्यांची लिखित परवानगी घेऊन डागडुजी आणि नव्या भिंतीच्या बांधकामास सुरुवात केली होती. मात्र गुरुवारी अचानक काही व्यक्तींनी घटनास्थळी येऊन कमिटीला भिंत बांधण्यास मज्जाव केला. त्यानंतर महापालिका कर्मचार्यांना बोलावून काम जबरदस्तीने थांबवण्यात आले.

परिसरात असुरक्षितता; मद्यपान आणि गैरवर्तनाचे प्रकार वाढले कब्रस्तान कमिटीचे सदस्य आणि उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, संरक्षणभिंत कोसळल्यामुळे कब्रस्तान परिसर पूर्णतः असुरक्षित झाला आहे. काही समाजकंटक कब्रस्तानमध्ये शिरून मद्यपान, लघुशंका, कचरा फेकणे असे अपमानास्पद कृत्ये करत आहेत. परिसरातून दारू, बिअरच्या बाटल्या मोठ्या प्रमाणावर सापडल्याने मुस्लिम समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

कार्यकर्त्यांनी सांगितले की, कब्रस्तानच्या पवित्रतेला व सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाल्याने संरक्षणभिंत तातडीने उभारणे अत्यावश्यक आहे. महापालिका कर्मचार्यांवर दबाव आणि आर्थिक स्वार्थाचे आरोप कमिटी सदस्यांनी आरोप केला की, जिल्हाधिकार्यांची परवानगी असतानाही महापालिकेच्या काही कर्मचार्यांनी कोणतीही शहानिशा न करता काम थांबवले. काही कर्मचाऱ्यांनी दबावाखाली व चिरिमिरीच्या लालसेने बांधकाम रोखल्याचा आरोप करण्यात आला. तसेच काही मुस्लिम समाजातील व्यक्तींनी, ज्यांनी कामाला विरोध केला, त्यांचा उद्देश भिंतीलगत कब्रस्तानच्या जागेवर छोटे गाळे बांधून दुकाने देण्याचा असल्याचा आरोपही करण्यात आला. कमिटीने अशा प्रयत्नांना पूर्णतः विरोध दर्शविला आहे.

**संरक्षणभिंतीचे काम पुन्हा सुरू**

परिस्थिती चिघळू नये म्हणून आज मुस्लिम समाजातील अनेक तरुण, नागरिक आणि कब्रस्तान कमिटीचे सदस्य एकत्रित आले. कब्रस्तानची पवित्रता, परिसराची सुरक्षा, आणि स्वच्छता कायम राखण्यासाठी संरक्षणभिंतीचे बांधकाम पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. अडथळा आणणारे महापालिका कर्मचारी व काही भू-माफियांवर गुन्हे दाखल करावेत, कब्रस्तान परिसरात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची मागणी.



त्यांनी पुन्हा संरक्षणभिंतीचे काम सुरू केले आणि लवकरात लवकर ही भिंत पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजातील बांधवांनी सांगितले की, कब्रस्तानची पवित्रता... आहे.

या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजाने पुढील मागण्या केल्या, भिंत बांधकाम पूर्ण होईपर्यंत पोलीस संरक्षण देण्यात यावे. कामात अडथळा आणणारे... करणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची मागणी. प्रसंगावेळी मुस्लिम समाजातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## जैन इंग्लिश स्कूल दुर्घटनाः पालक प्रतिनिधीमंडळाची पोलीस अधिक्षकांकडे धाव, तातडीच्या कारवाईची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** श्री एम.एस. जैन इंग्लिश स्कूलमध्ये १२ नोव्हेंबर २०२५ रोजी स्लॅबचा एक भाग कोसळून अनेक विद्यार्थी जखमी झाल्याची गंभीर घटना घडली होती. या प्रकरणी पालक हारेसखान खुद्दुसखान पठाण यांनी शाळा व्यवस्थापनाने जाणूनबुजून केलेल्या निष्काळजीपणाचा आरोप करत सदर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र तक्रार दाखल होऊनही कोणतीही कारवाई न झाल्याने नाराज पालकाने सोमवारी सायंकाळी शिष्टमंडळासह जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बंसल यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले आणि तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली. एसपी बंसल यांनी हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करत सदर बाजार पोलीस ठाण्यास आवश्यक तपास करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले जातील, असे आश्वासन दिले.

निवेदनात म्हटले आहे की शाळेची इमारत सुमारे ३० वर्षे जुनी असून येथे १२०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. इतकी जुनी इमारत असतानाही तिच्या दुरुस्ती, स्थावर तपासणी आणि सुरक्षा मानकांचे पालन केले गेले नाही, त्यामुळे संपूर्ण इमारत जर्जर होऊन धोकादायक स्थितीत पोहोचली आहे.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०:५५ वाजता पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये विद्यार्थी भोजन करत असताना अचानक छताचा भाग कोसळला आणि यात चार विद्यार्थी जखमी झाले. या विद्यार्थ्यांपैकी एकाची प्रकृती गंभीर झाल्याने त्याला तातडीने आय सी यु मध्ये **पान २ वर**



## शिकाऊ उमेदवारीसाठी भरती मेळावा

**जालना । प्रतिनिधी -** मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्राकडून जालना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पंतप्रधान राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन दि.८ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आला आहे. भरती मेळाव्यात जालना, छत्रपती संभाजीनगर व जालना येथील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. अंतिम वर्षात शिकत असलेल्या प्रशिक्षणार्थी व उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांनी भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहप्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# संपादकीय पान

## तरच वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या  इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे.  तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील  चार चाकी वाहनांची घनता  २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे.   रस्त्यांवर  असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात.  मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच  रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे.  मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे.  सरकारने  त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत.  वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी  मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने  जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना    आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी  सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल.  सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे.**

## शिंदे गटाचा भाजपावर गंभीर आरोप; मातोश्रीवर शिवसैनिकांची लगबग

**मुंबई -** पराभव लक्षात येताच निवडणूक आयोगाला हाताशी धरून २ डिसेंबरची निवडणूक रद्द केल्याचा आरोप शिंदे गटाने भाजपावर केला दोन दिवसांत शिंदेंच्या सेनेतील अनेक पदाधिकाऱ्यांनी ठाकरे गटात प्रवेश केल्याने मातोश्रीवर पक्षप्रवेशाची लगबग दिसून आली राज्यातील राजकीय वातावरण तापले असताना राज ठाकरे हे अचानक दिल्ली दौऱ्यावर जाणार असल्याने चर्चांना उधाण आले पार्थ पवार यांच्या पुण्यातील जमीन खरेदी प्रकरणावरून अंबादास दानवेंनी महायुती सरकारला चार महत्वाचे प्रश्न विचारले पाहायला मिळाले नगरपालिका निवडणुकांचा निकाल पुढे गेल्याने मतयंत्रांत घालमेल करण्याची संधी सरकारला मिळू शकते, अशी टीका कॉंग्रेसने केली  निवडणूक आयोगाने काही जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलल्यानंतर शिवसेना शिंदे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. अंबरनाथ नगरपरिषदेच्या निवडणुकीत पराभव लक्षात येताच निवडणूक आयोगाला हाताशी धरून २ डिसेंबर २०२५ रोजी होणारी निवडणूक रद्द करण्यात आली, असा आरोप शिंदेसेनेने भाजपावर केला आहे. निवडणूक पुढे ढकल्याने त्याचा मोठा त्रास हा उमेदवार व मतदार राजाला होणार आहे, त्यामुळे आम्ही निवडणूक आयोगाचा जाहीर निषेध करत आहोत, अशी बॅनरबाजी शिंदे गटाने अंबरनाथमध्ये केली आहे.

पान १ वरुन

## जैन इंग्लिश स्कूल ...

दाखल करून उपचार देण्यात आले.

शिष्टमंडळाने असा आरोपही केला आहे की संपूर्ण घटना शाळेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये रेकॉर्ड झाली होती; मात्र निष्काळजीपणा लपवण्यासाठी शाळा व्यवस्थापनाने हे फुटेज जाणीवपूर्वक नष्ट केले. त्यामुळे शाळा व्यवस्थापनाविरुद्ध संबंधित भारतीय न्याय संहिता कलमांनुसार गुन्हा दाखल करून सदर बाजार पोलिसांना तातडीने कठोर कारवाईचे निर्देश द्यावेत, अशी मागणी पालकांनी केली. प्रतिनिधीमंडळात हारेसखान खुद्दुसखान पठाण, ॲड. खुर्रम खान, मराठवाडा शिक्षक संघाचे जालना जिल्हा कार्याध्यक्ष फरखुंदअली सैय्यद,कोषाध्यक्ष नारायण मुंडे, उपाध्यक्ष जगन वाघमोडे,अंबड तालुका सचिव गणेश मेहेत्रे यांच्यासह इतर पदाधिकारी सहभागी होते.

# माणूस माणसासारखा का वागत नाही?

एकेकाळी पृथ्वीतलावर प्रत्येक माणूस माणसासारखा वागायचा, माणसासारखे वर्तन करायचा, एकमेकांच्या संकटात व सुखदुःखात वाऱ्याच्या वेगाने धावून जायचा. समाजकार्यात, लग्नकार्यात व इतर सामाजिक कार्यक्रमात माणूस निस्वार्थ भावनेने काम करायचा. गावातील कोणता व्यक्ती मरण पावला तर अख्खा गाव त्याच्या अंत्यविधीला जमायचा आणि ढसाढसा रडायचा. तेव्हा आपले आणि परके असा भेदभाव केला जात नव्हता. समाज बांधव व समस्त गावकरी आपलेच वाटायचे. एखाद्या स्त्रीवर वा महिलेवर जाणीवपूर्वक अन्याय होत असेल तर अख्खा गाव त्या पीडित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी तिच्या बाजूने खंबीरपणे उभा राहायचा, आणि त्या महिलेला न्याय मिळवून द्यायचा आणि माणुसकीची शोभा वाढवायचा. प्रत्येक माणूस आपल्याकडून माणुसकी कलंकित होणार नाही, याची खबरदारी घ्यायचा. भलेही तेव्हाचा माणूस तेवढा सुशिक्षित नव्हता पण आजच्या सुशिक्षित माणसाला लाजवेल असे वागायचा. हल्ली माणूस खूप शिकला आहे, भरपूर पुस्तके वाचला आहे, पदवीधर होऊन सुद्धा माणसाला माणसासारखे वागता येत नाही, हीच शोकांतिका आहे. एवढे शिकून सवरून जर माणूस माणसासारखे वर्तन करत नसेल, परस्त्रीकडे वासनांध व वखवखलेल्या दृष्टिकोनातून बघत असेल तर मला वाटते माणूस शिक्षण शिकूनही न शिकल्यासारखा आहे. म्हणजे आजच्या सुशिक्षित माणसांपेक्षा पूर्वीची अडाणी माणसेच लाख पटीने बरी होती. हल्ली माणूस एवढा शिकला आहे, अनेक पदव्या घेऊन बसला आहे. पण त्याच्यातली माणुसकी अजूनही जिवंत झाली नाही. पूर्वी माणसातील माणुसकी बावन्न कशी सोन्यासारखी चकाकत होती. माणूस माणुसकीला जिवापाड जपायचा. आपल्या वर्तनातून माणुसकी ओशाळणार नाही व आपल्या हातून अमानुष कृत्य घडणार नाही, याची जीवापाड काळजी माणूस घ्यायचा. त्याकाळी माणूस स्त्रियांकडे व महिलांकडे स्वच्छ व नितळ नजरेने बघायचा. परस्त्रीला मातेसमान मानायचा व दुसऱ्याच्या मुलीला आपली बहीण समजायचा. तेव्हा बलात्कार, व्याभिचार, अनाचार आणि अत्याचाराचे प्रमाण खूप कमी होते. तेव्हा घरोघरी एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. एका घरातील सर्व भाऊ एकत्र येऊन शेती करायचे, तेव्हा प्रत्येकाला भावाचा मुलगा आपलाच वाटायचा आणि भावाची मुलगी सुद्धा आपलीच वाटायची. तेव्हा आई-वडिलांना दैवत मानणारे सुपुत्र अस्तित्वात होते. त्याकाळी आई वडिलांना आपल्याकडे ठेवण्यासाठी सख्खे भाऊ एकमेकांना भांडायचे आणि आता आई-वडिलांना माझ्याकडे नको तर तुझ्याकडे ठेव म्हणून भाऊ एकमेकांना भांडत आहेत. अशी विदारक परिस्थिती सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे. पूर्वी आताच्या एवढे भांडण तंटे घरोघरी होत नव्हते. पूर्वीची माणसे खूप मायाळू व समजदार होती. नोकरदार भाऊ आपल्या शेतकरी भावाला शेतीचा व घराचा हिस्सा मागत नव्हता. उलट शेतकरी भावाच्या मुलाचा व मुलीचा शिक्षणाचा व लग्नाचा सारा खर्च सारायचा. म्हणून तेव्हा सगळीकडे मानवता आनंदाने नांदायची. माणूस माणसासारखा वागायचा. आपल्या शिलाला व चारित्र्याला जिवापाड जपायचा. परंतु हल्ली माणूस माणसासारखा का वागत नाही? माणसासारखे वर्तन व माणसासारखे कृत्य का करत नाही? आई-वडिलांना म्हातारपणात न सांभाळता वृद्धाश्रमात का पाठवत आहे? माणूस एवढा हैवान व नराधम कसा काय बनलाय? शाळेत शिकायला असताना माणूस प्रार्थना करायचा की, भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत, माझ्या देशावर माझे प्रेम आहे. अशी प्रतिज्ञा प्रत्येक जण शालेय जीवनात असताना करायचा. परंतु एकीकडे सारे भारतीय माझे बांधव आहेत, माझ्या देशावर माझे प्रेम आहे, अशी प्रतिज्ञा घ्यायची आणि दुसरीकडे आपल्याच देशातील मुलींवर बलात्कार करायचे, त्यांच्याकडे वासनांध नजरेने बघायचे आणि इकडे म्हणायचे सारे भारतीय माझे बांधव आहेत. हे असे कसे चालेल हो? तीन वर्षाच्या चिमूरडीपासून ते ८० वर्षाच्या वृद्ध म्हातारी पर्यंत बलात्कार करण्यासाठी हल्ली माणूस लिंग पिसाट झाला आहे. देशात बलात्काराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. कोणत्या नात्यासोबत कसा व्यवहार करायचा असतो याचे आजकालच्या लिंग पिसाट युवकांना भान राहिले नाही. माणूस बहीण बघत नाही, भावाची बायको बघत नाही, पोटची मुलगी बघत नाही, वासनेच्या भरात तो लिंग पिसाट होऊन बलात्कार करून नात्यातील पावित्र्य कलंकित करत आहे. शाळेतील शिक्षक आपल्याच विद्यार्थिनीवर अमानुष अत्याचार करून गुरु शिष्याचे नाते कलुषित करत आहे. आई वडील शेती नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना जीवे मारणारे महाभाग या देशात खूप आहेत. थोड्याफार जागेसाठी सख्खे भाऊ एकमेकांचे पक्के वैरी बनून रोज हाणामारी करून घेत आहेत. कोर्टकचेरी व पोलीस स्टेशनला खेटे मारत आहेत आणि अमानुष्यतेचा कळस गाठत आहेत. माणूस एवढा अमानुषपणे का वागतोय? माणूस माणसासारखे वागायचे सोडून रानटी जनावरासारखे का वागत आहे? कळायला मार्ग नाही, पण माझ्या मते आजकालच्या मुलांना आई वडिलांचा जराही धाक राहिला नाही. त्यांच्यावर संस्काराची रुजवण करण्याच्या वयात त्यांचा अतिलाड केला जात आहे. आजकाल हम दो हमारे दो या पद्धतीचा अवलंब केला जात आहे. आणि प्रत्येकजण एकुलता एक वंशाचा दिवा म्हणून त्याचा अतिलाड करून त्याला कसेही मोकाट कुत्र्यासारखे मोकळे फिरू देत आहे. त्याला मनमानी व वाट्टेल तसे जीवन जगू देत आहेत. म्हणून आजकालची मुले बिघडून जात आहेत. शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यांना मारायला अधिकार नसल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना जराही घाबरत नाहीत. बरेच विद्यार्थी शिक्षकांना घाण घाण शिव्या देऊन त्यांची मानहानी करत आहेत. जोपर्यंत आई-वडील आपल्या मुलांना धाकात ठेवणार नाहीत, त्यांच्यावर संस्काराची योग्य पेरणी करणार नाहीत आणि शाळेतील शिक्षक जोपर्यंत विद्यार्थ्यांना छडीचा धाक दाखवणार नाहीत तोपर्यंत मुले असे वाईट कृत्य करणारच आहेत. देशात बलात्कार आणि व्याभिचार वाढत जाणार आहे. माणूस माणसासारखे न वागण्याचे एकमेव कारण हेच आहे. आई-वडिलांच्या धाकाला संस्कार म्हणतात तो संस्कार जोपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये जागा होणार नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा होणार नाही, उलट मुले बिघडत जाणार आहेत. त्यासाठी गरज आहे पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना धाक दाखवून त्यांच्यावर संस्काराची छाप पाडण्याची...आणि माणूस बनून माणसासारखे वागायला शिकवण्याची...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# दिल्ली ते इंद्रप्रस्थ : सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा 'शंखनाद'!

प्रस्तावना: भारतीय राजधानी दिल्ली हे शहर केवळ प्रशासकीय केंद्र नसून सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवाचे अद्वितीय प्रतीक आहे. राष्ट्रपती भवन, राजपथ, संसद भवन, विविध कलादलांची परंपरा, उद्योगविश्व आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेली लोकसंस्कृती या सर्वांनी मिळून दिल्लीचा बहुआयामी स्वभाव घडवला आहे. हीच दिल्ली प्राचीन काळात 'इंद्रप्रस्थ' म्हणून ओळखली जात होती महाभारतकालीन पांडवांची भव्य राजधानी आणि सांस्कृतिक वैभवाची मूळ जननी. कालांतराने आक्रमणांच्या मालिकेत या शहराची मूळ ओळख धूसर झाली; तिच्या नावावर, संस्कृतीवर आणि जीवनदृष्टीवर परकीय छटा चढल्या. आज संपूर्ण देशभरातून दिल्लीला तिचे प्राचीन, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक नाव 'इंद्रप्रस्थ' परत मिळावे, अशी जोरदार मागणी होत आहे. या राष्ट्रीय चळवळीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव'ही सक्रिय भूमिका बजावत आहे.

दिल्लीचा इतिहास आणि ऐतिहासिक पुरावे ! : इंद्रप्रस्थ हे महाभारतकालीन नगर असून पांडवांची राजधानी म्हणून प्रसिद्ध आहे. यमुनेच्या काठी वसलेले हे नगर त्या काळी कला, शौर्य, प्रशासन आणि वैभवाचे केंद्र मानले जात होते. ऐतिहासिक आणि पुरातत्त्व संशोधनातील पुरावे बघितल्यास, मौर्य, शुंग, कुशाण, गुप्त, राजपूत, सुलतान आणि मोगल काळातील विविध अवशेष दिल्लीमध्ये



आढळले आहेत. विशेषतः पुराना किल्ल्यात १९५५ व २०१३-१४ मध्ये भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने (ডख) केलेल्या उत्खननांत 'पेन्टेड ग्रे वेअर' (झरळपींशव ग्रीशू थरीश) संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. या संस्कृतीचा संबंध महाभारतकालाशी मानला जातो. अनेक प्राचीन ग्रंथ, प्रवासी आणि इतिहासकार दिल्ली क्षेत्राला 'इंद्रपत्त' किंवा 'इंद्रप्रस्थ' या नावानेच ओळखतात. ही सांस्कृतिक स्मृती आजही आधुनिक दिल्लीच्या परिचयात जपली गेली आहे.

नावबदलाचा सांस्कृतिक अर्थ ! : इंद्रप्रस्थ हे नाव फक्त ऐतिहासिक नाही, तर आध्यात्मिक आणि सांस्कृतिक स्वाभिमानाचेही प्रतीक आहे. महाभारताच्या कथेनुसार पांडवांनी यमुनेच्या काठी असलेल्या खांडववनातून (कांडवप्रस्थ) नवे भव्य नगर उभारले आणि देवाधिदेव इंद्राच्या सन्मानार्थ त्या नगराला 'इंद्रप्रस्थ' हे नाव दिले, त्यामुळे हे नाव दैवी परंपरा, सांस्कृतिक ओळख आणि राजसत्ता या तीनही घटकांचे प्रतिनिधित्व करते. नव्या पिढीला त्यांच्या इतिहासाशी जोडणारे, स्वाभिमानाची भावना जागवणारे हे नाव दिल्लीच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते. दिल्लीला 'इंद्रप्रस्थ' हे नाव दिल्यास पर्यटन, स्थानिक उद्योग, हॉटेल्स आणि हस्तकला क्षेत्रासदेखील मोठा फायदा होऊ शकतो. राजकीय वा प्रशासनिक पातळीपलिकडे हा बदल राष्ट्रीय सांस्कृतिक पुनर्जागरणाचा एक मोठा टप्पा ठरू शकतो.

'इंद्रप्रस्थ'चा मागोवा, संशोधन आणि मागणी ! : 'द्रौपदी ड्रीम ट्रस्ट'च्या नीरा मिश्रा यांनी इंद्रप्रस्थच्या इतिहासावर उल्लेखनीय संशोधन करून या संकल्पनेला शास्त्रशुद्ध आधार दिला आहे. पुराना किल्ल्यातील उत्खनन, महाभारत आणि पौराणिक संहितांचे उल्लेख, चीन-ग्रीस प्रवाश्यांची नोंद, भौगोलिक प्रतिपादन आणि ऐतिहासिक साहित्य यांचा सखोल अभ्यास करून त्यांनी 'इन्द्रप्रस्थ रीविसिटेड' (खपवीरींीींहर ठशींळीळींशव) हे महत्त्वपूर्ण पुस्तक प्रकाशित केले आहे. भाजप खासदार श्री. प्रविण खंडेलवाल यांनी केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह यांना दिल्लीचे नाव 'इंद्रप्रस्थ' करण्यासाठी पत्राद्वारे विनंती केली आहे. ते जुन्या दिल्लीवरील रेल्वे स्थानकाचे नाव 'इंद्रप्रस्थ जंक्शन' आणि दिल्ली विमानतळाचे नाव 'इंद्रप्रस्थ आंतरराष्ट्रीय हवाई अड्डा' हे नाव, तसेच पांडवांच्या पुतळ्यांची उभारण्याची मागणी त्यांनी केली आहे.

शंखनाद महोत्सवात भूमिकेचे महत्त्व ! : 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत आणि 'सनातन संस्था' आयोजित 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा राष्ट्रीय स्तरावरील भव्य कार्यक्रम १३-१४ डिसेंबर २०२५ रोजी 'भारत मंडपम' (इंद्रप्रस्थ) येथे होत आहे. या महोत्सवात शिवकालीन शस्त्रप्रदर्शन, प्राचीन भारतीय सुरक्षा व्यवस्था, शौर्याची उजळणी आणि सांस्कृतिक वारसा या सर्व गोष्टींचा जागर केला जाणार आहे. हा महोत्सव केवळ सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे स्फुलिंग जागवणार कार्यक्रम न राहता 'दिल्ली ते इंद्रप्रस्थ' या परिवर्तनाच्या प्रक्रियेला समाजाच्या एकत्रित सहभागाने गती देणारा ऐतिहासिक क्षण ठरणार आहे. तर मग चला, इंद्रप्रस्थाचा शंखनाद करण्यासाठी पुढे सरसावूया!

**श्री. चेतन राजहंस, प्रवक्ता, सनातन संस्था, संपर्क : ७७७५८५८३८७**

# भारतीय चित्रपटाचा पहिला निर्माता 'व्ही. शांताराम' लवकरच मोठ्या पडद्यावर

भारतीय चित्रपटसृष्टीला नवी दृष्टी, नवे तत्त्वज्ञान आणि नवी सौंदर्यभाषा देणारे शांताराम राजाराम वणकुद्रे म्हणजेच व्ही. शांताराम. या महापुरुषाचे असामान्य, प्रेरणादायी आणि वैभवशाली जीवन आता पहिल्यांदाच एका भव्यदिव्य चित्रपटाच्या महाकाव्यातून उलगडणार आहे. स्टुडिओतील साध्या कामगारापासून जागतिक दर्जाची कलाकृती निर्माण करणाऱ्या दिग्दर्शकापर्यंतचा त्यांचा प्रवास म्हणजे धडपड, प्रयोगशीलता, कामाप्रती असलेली निष्ठा आणि कलाप्रेम यांचा दिव्य संगम यात अनुभवायला मिळणार आहे.

'झनक झनक पायल बाजे'च्या नृत्यवैभवापासून 'दो आंखें बारह हाथ'च्या सामाजिक विचारांपर्यंत, 'अमृतमंथन'च्या तांत्रिक क्रांतीपासून 'नागरिक'च्या वास्तववादी कथानकापर्यंत व्ही. शांताराम यांच्या प्रत्येक कलाकृतीने भारतीय चित्रपटाला नवी दिशा दिली. त्यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे संघर्ष, सर्जनशील ध्यास आणि जग बदलण्याच्या अढळ विश्वासाची उज्ज्वल परंपराच. आता त्यांचे असामान्य, प्रेरणादायी आणि वैभवशाली जीवन एका मेगा बायोपिकच्या रूपात मोठ्या पडद्यावर येत आहे. जे व्हिज्युअली ग्रँड, इमोशनली पॉवरफुल आणि सिनेमॅटिकली आयकॉनिक असणार आहे.

'व्ही. शांताराम' या चित्रपटाचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले असून सोशल मिडियावर या पोस्टरने धुमाकूळ घातला आहे. यातील वैभव, भव्यता, दृश्य पाहून प्रेक्षकांमध्ये उत्सुकतेची नवी लाट उसळली आहे. या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी व्ही. शांताराम यांच्या भूमिकेत झळकणार असून ही भूमिका त्याच्या कारकिर्दीतील एक गेम चेंजर ठरणार आहे.

'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर' या गाजलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक अभिजित शिरीष देशपांडे यांनी या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन केले असून भव्य दृश्यरचना आणि कलात्मक दृष्टीने त्यांनी या चित्रपटाला एका विशिष्ट उंचीवर नेले आहे.

दिग्दर्शक अभिजित शिरीष देशपांडे म्हणतात, ''व्ही. शांताराम हे नाव उच्चारताना केवळ एका व्यक्तीची चर्चा होत नाही, तर भारतीय चित्रपटाची संपूर्ण तत्त्वज्ञानपर परंपरा डोळ्यांसमोर उभी राहाते. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, त्यांची निष्ठा, प्रयोगांची भीती न बाळगता कलाप्रवाहात झेप घेण्याची त्यांची हिंमत  हे सर्व पडद्यावर साकारताना एक वेगळीच आध्यात्मिक अनुभूती मिळाली. या चित्रपटातील प्रत्येक फ्रेम, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची प्रेक्षकांपर्यंत पोहोचावी, हाच माझा प्रयत्न आहे.'

निर्माते राहुल किरण शांताराम म्हणतात, ''हा चित्रपट म्हणजे माझ्यासाठी केवळ प्रोजेक्ट नसून ती एक भावना आहे. हा चित्रपट म्हणजे आमच्या सर्वांकडून आजोबांच्या कर्तृत्वाला वाहिलेली भव्य श्रद्धांजली आहे. व्ही. शांताराम यांनी भारतीय चित्रपटाला दिलेले योगदान किती अपरिमित आहे, हे आजच्या नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, हा आमच्या निर्मितीमागचा मुख्य उद्देश आहे. त्यांच्या जीवनातील तेज, त्यांची दृष्टी, त्यांची धडपड हे सर्व जगाने पुन्हा अनुभवावे, म्हणून हा चित्रपट आम्ही अत्यंत भव्यतेने, तांत्रिक उत्कृष्टतेने आणि संवेदनशीलतेने साकारत आहोत. निर्माते सुभाष काळे म्हणतात, '' व्ही. शांताराम हे नाव उच्चारलं की, भारतीय चित्रपट घडवणाऱ्या एका संपूर्ण परंपरेचा इतिहास समोर उभा राहातो. आपल्या देशातील एका मराठी माणसाने जागतिक दर्जाचा उद्योग घडवण्यात इतकं मोठं योगदान दिलं, ही गोष्ट अभिमानास्पद तर आहेच, परंतु आजच्या पिढीसाठी प्रेरणादायीही आहे. त्यांच्या प्रत्येक प्रयोगात एक नवी दृष्टी, एक नवा विचार आणि कलाकौशल्याचा अद्वितीय आविष्कार होता. या चित्रपटातून आम्ही त्या वैभवाचा, त्या संघर्षाचा आणि त्या भव्य परंपरेचा खरा आत्मा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे.''

राजकमल एंटरटेनमेंट, कॅमेरा टेक फिल्म्स ण्ड रोअरिंग रिव्हर प्रोडक्शन प्रस्तुत या चित्रपटाचे राहुल किरण शांताराम, सुभाष काळे आणि सरिता अश्विन वर्दे निर्माते आहेत. येत्या नवीन वर्षात हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

### ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

# विभागात एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार मतदारयादीच्या प्रारूप प्रसिध्दीचा दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ (बुधवार) होता. त्यानुसार प्रारुप मतदार यादी आज प्रसिध्द करण्यात आली.

विभागीय आयुक्त कार्यालयात या कार्यक्रमावेळी विभागीय आयुक्त तथा ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर, अपर आयुक्त सामान्य प्रशासन तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांच्यासह तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४६ हजार ४०६ पुरूष, १५ हजार ९०८ महिला व ४ तृतीयपंथी असे एकूण ६२ हजार ३१८ मतदार आहेत. जालना जिल्ह्यात एकूण २३ हजार ६४८ पुरूष, ५ हजार २७२ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २८ हजार ९२२ मतदार आहेत. परभणी जिल्ह्यात १६ हजार ६३५ पुरूष, ४ हजार ६४ महिला तर १ तृतीयपंथी असे एकूण २० हजार ७०० मतदार आहेत. हिंगोली जिल्ह्यात ६ हजार ४७६ पुरूष, १ हजार ५२८ महिला असे एकूण ६ हजार ४ मतदार आहेत. नांदेड जिल्ह्यात २३ हजार ८६७ पुरूष, ६ हजार २६४ महिला तर ४ तृतीयपंथी असे एकूण ३० हजार १३५ मतदार आहेत. लातूर जिल्ह्यात १७ हजार ४९२ पुरूष, ४ हजार ९९३ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २२ हजार ४८७ मतदार आहे. धाराशिव जिल्ह्यात १६ हजार ७६२ पुरूष, ४ हजार ४७ महिला असे एकूण २० हजार ८०९ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ३४ हजार ४८५ पुरूष, ९ हजार ६८७ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण ४७ हजार १७४




मतदार आहेत. विभागातील आठही जिल्ह्यात एकूण १ लाख ८८ हजार ७७१ पुरूष, ५१ हजार ७६३ महिला तर १५ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार आहेत.

पुढील अत्यंत महत्वाचा टप्पा, म्हणजेच दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (कलम १२ अन्वये) (Period for filing of claims and objections), हा दिनांक ०३ डिसेंबर २०२५

(बुधवार) ते १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकती दिनांक ०५ जानेवारी, २०२६ पुर्वी निकाली काढण्यात येणार आहेत. अंतिम मतदार यादी प्रसिद्धी दिनांक १२ जानेवारी, २०२६ (सोमवार) असा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा गुरुवारी शुभारंभ

**जालना । प्रतिनिधी -** भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले, अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जिवनातील अडी-अडचणी दुर करुन त्यांचे दैनंदिन जिवन सुसह्य व्हावे यासाठी व त्याचप्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातुन सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी संपुर्ण भारतात ७ डिसेंबर हा दिवस ध्वजदिन म्हणुन साजरा करण्यात येतो. व त्या निमित्ताने ०७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेर पर्यंत ध्वजदिन निधी संकलन केले जाते. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना यांचे वतीने सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभ गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी दूपारी ३ वाजता महासैनिक लॉन, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, क्रीडा संकूलासमोर, जालना येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती अध्यक्ष आशिमा मित्तल यांच्या शुभहस्ते तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल व इतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमाच्यानिमित्त शहीद जवानांना श्रध्दांजली, देशाच्या सिमांचे रक्षण करतांना प्राणाचे बलिदान देवून शहिद झालेल्या सैनिकांच्या विरपत्नी, विरमाता व विरपिता यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांमध्ये सैनिकांविषयी जनजागृती व आपुलकी निर्माण करुन उत्कृष्ट कामगिरी करुन ध्वजदिन-२०२४ निधी संकलन केलेल्या कार्यालयांना पारितोषिक कार्यालय प्रमुख व संबंधीत कर्मचाऱ्यांस प्रशस्तीपत्र वाटप तसेच माजी सैनिक, विधवा पत्नी यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती, आर्थिक मदतीचे धनादेश, गौरव पुरस्कार व प्रशस्तीपत्र वाटप करण्यात येणार आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी, वीर पिता, वीर माता, माजी सैनिक विधवा पत्नी, माजी सैनिक व त्यांचे अवलंबित, पत्रकार बांधव, उत्कृष्ट संकलन केलेल्या कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व सामान्य नागरिकांनी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## गोवंश वाहतूक करणारे वाहन पकडले

### सात बैल आणि एक गायसह बोलेरो पिकअप पोलिसांच्या ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील बदनापूर तालूक्यातील गेवराई बाजार येथून जालना शहराकडे कत्तलीसाठी गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच गौरक्षकांनी कारवाई करत एक बोलेरो पिकअप वाहन चंदनझीरा पोलिसांच्या ताब्यात दिले. या वाहनात सात गोवंश आणि एक गाय आढळून आली असून वाहन जप्त करून पुढील कारवाई सुरु आहे.



गौरक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर गोवंश जालना शहरात कत्तलीसाठी आणले जात असल्याची खबर मिळाल्यानंतर त्यांनी पिकअपचा पाठलाग करून वाहन अडविले.गौरक्षकांनी वाहन चालकास जनावरांविषयी चौकशी केली असता सदरील जनावरे जूना जालन्यातील आवेस कुरेशी यांच्याकडे जात असून पिकअप वाहन किरायाने असल्याचे सांगीतले. तद्नंतर वाहन थेट चंदनझीरा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले.

चंदनझीरा पोलिसांनी वाहन ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रिया सुरु केली असून गोवंशांच्या सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात येऊन सदरील गोवंश शहरातील गौशाळेत सोडण्यात येणार आहेत. गौरक्षकांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, या आठवड्यात चंदनझीरा पोलीस ठाणे हद्दीत अशी तिसरी कारवाई आहे. सतत वाढत असलेली अवैध गोवंश वाहतूक आणि संभाव्य गौहत्या रोखण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी तातडीने कठोर पावले उचलावीत.

या सततच्या कारवायांमुळे परिसरात गोवंश तस्करीचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला असून जनतेतही संतापाची लाट आहे. प्रशासकीय स्तरावर आता या प्रकारांविरोधात अधिक कडक उपाययोजना करण्याची गोरक्षकांनी मागणी केली आहे.

## वकील दिनानिमित्त ॲड. धन्नावत यांच्या सामाजिक कार्याचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** वकील दिनाचे औचित्य साधून, येथील प्रसिद्ध वकील आणि नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धन्नावत यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत नागेबाबा मल्टीस्टेट परिवारातर्फे त्यांचा नागेबाबा उद्योग समूहाचे अध्यक्ष कडूभाऊ काळे यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'विचारधन' हे पुस्तक भेट देऊन हा गौरव करण्यात आला.

ॲड. महेश धन्नावत यांनी आपल्या वकिली व्यवसायाच्या पलीकडे जाऊन समाजासाठी भरीव योगदान दिले आहे. शहरातील पायाभूत सुविधा जसे की रस्ते, गटारलाईन आणि शौचालये यांच्या उभारणीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. तसेच, गरजू आणि गरीब नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला व मदत देऊन त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांच्या याच कार्याची पोचपावती म्हणून हा सत्कार आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी नागेबाबा मल्टीस्टेटचे महेश सराटे यांनी ॲड. धन्नावत यांच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, ड. धन्नावत यांचे सामाजिक कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. नागेबाबा उद्योग समूहाचे अध्यक्ष कडूभाऊ काळे यांनी 'विचारधन' हे पुस्तक खास त्यांच्यासाठी पाठवले आहे. या पुस्तकातील छोटे-छोटे विचार ड. धन्नावत यांना भविष्यातही समाजासाठी अधिक चांगले काम करण्यास प्रोत्साहित



करतील. तसेच, प्रत्येक चांगले कार्य हे ईश्वराकडूनच घडत असते आणि आपण केवळ एक माध्यम आहोत, ही भावना त्यांच्या मनात राहावी, हा यामागील उद्देश आहे.

सत्काराला उत्तर देताना ड. महेश धन्नावत यांनी धन्नावत मल्टीस्टेट परिवाराचे आभार मानले. यावेळी त्यांनी भारतात 'वकील दिन' का साजरा केला जातो, याचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. भारताचे पहिले राष्ट्रपती आणि एक प्रख्यात कायदेतज्ञ डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त ३ डिसेंबर रोजी देशभरात वकील दिन साजरा केला जातो. कायदेपंडित म्हणून आणि भारताच्या घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. प्रसाद यांनी देशाच्या उभारणीत दिलेले योगदान अतुलनीय आहे. हा दिवस केवळ वकिलांचा सन्मान करण्याचा नाही, तर कायद्याचे राज्य आणि न्यायव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करण्याचा दिवस आहे, असेही ते म्हणाले.



### लोकसहभागामुळे नावारूपास येत असलेली नळविहिऱ्याची जिल्हा परिषद शाळा

# सध्या चार वर्गातून डिजिटल शिक्षण, लवकर संपूर्ण शाळा होणार डिजिटल

विशाल देशमुख

आज आपण सोशल मीडिया आणि काही मुद्रित माध्यम ातून जिल्हा परिषद शाळांची दुरावस्था, शिक्षकांची अनास्था याविषयी बातम्या पाहतो. मात्र या बाबीला जाफराबाद तालुक्यातील सर्वच केंद्रातील अनेक शाळा अपवाद ठरल्या आहेत. जाफराबाद तालुक्यातील केंद्रातील नळविहिरा शाळा ही एक आदर्श शाळा ठरली आहे. या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते आठवी वर्ग असून विद्यार्थी संख्या २१३ तर एक मुख्याध्यापक आणि ८शिक्षक कार्यरत आहेत.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रिये बरोबरच त्यांच्याकडून स्कॉलरशिप परीक्षा, नवोदय परीक्षा, एन एन एम एस परीक्षा, मंथन परीक्षांच्या साठी सातत्यपूर्ण मार्गदर्शन करण्यात येते. विद्यार्थ्यांना दिला जाणारा शालेय पोषण आहार देखील दर्जेदार असतो याशिवाय पूरक आहार देखील दिला जातो. शाळा समिती ग्राम संसद,शिक्षक आणि पालक यांच्या मध्ये योग्य समन्वय असल्याने इंग्रजी माध्यम किंवा अन्य शाळांकडे ग्रामस्थांचा कल नाही

शाळेमध्ये दैनंदिन अध्यापनासह विद्यार्थ्यांच्या शालेय मैदानी कवायती, शैक्षणिक सहली, बाजार आणि आनंद नगरी, वार्षिक स्नेहसंमेलन असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्ण करणारे कार्यक्रम देखील सातत्याने राबविण्यात येतात. यासाठी सर्व ग्रामस्थांनी पालक देखील सातत्याने सहकार्य करत असतात.

**लोकसहभाग वाढतोय**

विद्यार्थ्यांचे अध्ययन आणि शिक्षकांचे अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी शाळेम ध्ये स्मार्ट बोर्ड वित स्मार्ट टीव्ही आहे.अन्य एक स्मार्ट टीव्ही आहे याशिवाय रोशन पिंपळे आणि आणि चंद्रकांत खरात यांनी शाळेला प्रत्येकी एक स्मार्ट टीव्ही भेट दिली आहे. शाळेतील शिक्षकांनी सुद्धा शाळेसाठी प्रत्येक वर्गात कचरा कुंडी, सुपळी, नेलकटर, भिंतीवरील घड्याळ, नॅपकिन, पाय पुसण्या आणि अनेक विद्यार्थी उपयोगाच्या वस्तू स्वखर्चाने दिल्या आहेत. यासाठी मुख्याध्यापक शिवहरी नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तू मुनेमाणिक, काशिनाथ उखर्डे, विनोद कळंबे , दिपक चव्हाण , सुनील अंभोरे , ज्ञानेश्वर झगरे, मंजुषा बकतकार , पूजा गहेरवाल यांचे सहकार्य लाभले.

शाळा परिसरात ८ पैकी फक्त २ वर्गखोल्या ह्या स्लॅब च्या असून बाकी ६ खोल्या ह्या पत्राच्या आहेत. यासाठी शाळा समिती आणि ग्राम पंचायत यांच्या माध्यमातून यासाठी पाठपुरावावा सुरू आहे. ग्रामपंचायतच्या माध्यमातून लवकरच उर्वरित चार शाळा खोल्यांमध्ये देखील स्मार्ट अँड्रॉइड टीव्ही उपलब्ध होणार असल्याने शंभर टक्के शाळा डिजिटल होणार आहे.शाळा परिसराला मजबूत आवार भिंतीची ही आवश्यकता आहे. जिल्हा परिषद आणि वरिष्ठ कार्यालयांकडून वेळोवेळी देण्यात येणारे उपक्रम उदाहरणार्थ जागतिक त्सुनामी जनजागृती दिन,जागतिक एड्स दिन, जागतिक आरोग्य आणि इतर दिनविशेष यांची माहिती विद्यार्थ्यांना स्मार्ट बोर्ड द्वारे दिली जाते.याशिवाय शाळेत उपलब्ध असणाऱ्या विज्ञान प्रयोग शाळेतील साहित्यातून प्रत्यक्ष अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात येतात. उदा:पेशींची रचना, मानवी हृदय,पचनसंस्था, दूरदर्शीचा वापर आणि इतर प्रयोग सादर केले जातात. विज्ञानातील कठीण वाटणारे घटक विद्यार्थी नाट्यरूपाने सादर करून या अध्ययन अध्यापन प्रक्रियेत सहभाग नोंदवतात.

**ग्रामस्थांची साथ** आपल्या पाल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा आणि शिक्षक करत असलेल्या सर्वतोपरी प्रयत्न यांना ग्रामस्थ ही चांगल्या पद्धतीने प्रतिसाद देत आहेत. शाळेतील इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी वैष्णवी मोरे हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पालक भागवत मोरे यांनी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी २० चटया उपलब्ध करुन दिल्या आहेत. याशिवाय शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी जवळपास ७० हजार रुपये किमतीचे स्पोर्ट ड्रेस शाळा समिती,गावातील व्यावसायिक, शिक्षण प्रेमी नागरिक लवकरच उपलब्ध करून देणार आहेत.शाळेचे शिक्षक विनोद कळंबे आणि बदली झालेले शिक्षक प्रमोद कळंबे यांनी देखील एक व्हाईट बोर्ड भेट दिला आहे. जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम मित्रु यांनी सुरू केलेल्या सक्षम जालना या उपक्रमांतर्गत प्रत्येक केंद्रातून एका शाळेची निवड करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील कॉर्पोरेट कंपनीच्या म ाध्यमातून या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या शाळांसाठी भौतिक सोयी आणि सुविधांसाठी निधी उपलब्ध होणार आहे या उपक्रमांतर्गत कुंभारझरी केंद्रातून नळविहीरा शाळेची निवड झालेली आहे.



मुख्याध्यापक, सर्व शिक्षक बंधू,भगिनी यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न, ग्रामस्थ ग्राम संसद आणि शाळा व्यवस्थापन समिती यांची खंबीर साथ यामुळे आमची नळविहीरा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नावावर उपास येत असून आगामी काळात मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा या अभियानात आम्ही सहभाग नोंदवणार आहोत. आमच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व्यवस्थापन कटीबद्ध असल्याचे नळविहीरा येथील पदवीधर शिक्षक दत्तू मुनेमाणिक यांनी म्हटले आहे.

---

# यशस्वी जीवना करिता श्री गुरूंची आवश्यकता

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** मानवाच्या यशस्वी जीवनाकरिता श्री गुरूंची नितांत आवश्यकता असते.

असे असे प्रतिपादन ह भ प नारायण पिंपळे गुरुजी यांनी श्री दत्तात्रेय भगवंत जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सुरू असलेल्या श्रीक्षेत्र खापरखेडा तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील अखंड हरिनाम सप्ताह मध्ये केले.



श्री दत्तात्रय भगवंत जनोसोहळा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे त्यामध्ये दिनांक १/१२/२०२५ रोजी पिंपळे महाराजांची किर्तन रुपी सेवा झाली.

!हेचि भक्ती हेचि ज्ञान, नये वृत्तीवरी मन!

या कीर्तन रुपी सेवेकरिता घेतलेल्या अभंगावर निरूपण करताना महाराज म्हणाले की आजच्या काळामध्ये खरी भक्ती कोणती आहे व खरं ज्ञान कोणतं आहे हे जर पाहायचं असेल तर त्यासाठी श्री गुरुंची नितांत आवश्यकता आहे श्री गुरु मिळाल्याशिवाय ते ज्ञान ती भक्ती कोणती श्रेष्ठ आहे ते कळत नाही. परंतु त्याकरिता श्री गुरु मिळणे अत्यंत दुर्लभ आहे . दुर्लभम त्रैमेव येत तह देवता नु ग्रह हेतुकम ,मनुष्यत्व मुमुक्षत्व, महापुरुषस संश्रेया.

म्हणजेच या जगामध्ये तीन गोष्टी अतिशय दुर्लभ आहेत त्या म्हणजे मनुष्य जन्म दुर्लभ आहे मुमुक्षुत्व दुर्लभ आहे आणि महापुरुष म्हणजे संतांची संगत श्रीगुरुंची संगत अतिशय दुर्लभ आहे.

आपल्या अंतकरणातील मल विक्षेप दोष गेल्याच्या नंतर आवरण दोष घालवण्याकरता श्रीगुरु भेटणे गरजेचे आहे. ते भेटल्यानंतर मानवाचे जीवन निश्चित यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही .त्यामुळे श्री गुरूंची जीवनात नितांत गरज आहे.

या श्री गुरुदत्त जन्मोत्सव सोहळा आनंदाने यशस्वी करण्याकरिता प्रयत्न करणारे सर्व गावकरी मंडळी यावेळी उपस्थित होते. यावेळी गायनाचार्य (झी टॉकीज फेम)ह भ प अनिल महाराज देवडे, ह भ प विष्णु महाराज, ह.भ.प. वैभव महाराज सोनवणे, ह भ प मृदंगाचार्य शंकर महाराज, ह भ प कृष्णा महाराज मोहिते, ह भ प कैलास महाराज, ह भ प माधव महाराज व इतर सर्व गुन्हेजन मंडळी उपस्थित होते.

# भवरोगावर प्रभावी औषध म्हणजे ब्रह्म रसाचा काढा होय- डॉ प्रमोद कुमावत

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** मी कोण आहे, माझे काय आहे व जीवनामध्ये माझे ध्येय काय आहे याचा गांभीर्याने विचार संतांनी केला आहे व आपण सर्वांनी करावा असे संत सांगतात. स्वतःला ओळखणे हीच खरी भक्ती आहे, सर्व संतांनी स्वतः ला ओळखून ते सुखी झाले. म्हणून सर्व संत म्हणतात की प्रत्येकाने स्वतः ला ओळखले पाहिजे तसेच संसाराचे खरे स्वरूप ओळखले पाहिजे हीच खरी भक्ती आहे असे प्रतिपादन बाबुलतारा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी कीर्तन करताना डॉ.प्रमोद म हाराज कुमावत यांनी केले. ते ब्रह्म रस घेई काढा, जेणे पीडा वारेल,पथ्य नाम विठोबाचे आणिक वाचे न सेवी,भवरोग ऐसे जाय, आणिक काय क्षुल्लके, तुका म्हणे नव्हे बाधा, आणिक कदा भुतांची या जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या अभंगावर निरूपण केले.

या संसारामध्ये आपण कसे राहावे यासंबंधी बोलताना कुमावत महाराज म्हणाले की भवरोग हा मोठा रोग असून जन्म मरणाच्या दुःखामध्ये घालीत असतो म्हणून या रोगावर मोठे औषध म्हणजे ब्रह्म रसाचा काढा घ्यावा. अर्थात ब्रह्म ज्ञान हेच भवसागर पार पडण्याचे प्रभावी मार्ग आहे. मनात पाप, भ्रष्टाचार हा लोभामुळे होतो तर दुःख हे मोहामुळे होते त्यामुळे या अंतः करणातील विकारांचा त्याग करावा, परमेश्वराची भक्ती करावी, जगाला प्रेम अर्पण करावे यामुळे इहलोकातील सुख व परलोकातील सुख प्राप्त होते. आपण जे कर्म करतो त्या कर्मानुसार आपण जगत असतो आजचे जगणे हे कालच्या कर्मावर अवलंबून असते त्यामुळे मनुष्याने नेहमी चांगले कर्म, सत्कर्म केले पाहिजेत. संसारामध्ये आपण प्रयत्नवादी असले पाहिजे पण प्रयत्न करूनही जर आपल्याला इच्छित फलप्राप्ती होत नसेल तर त्याविषयी आपण दुःखी होण्याचे कारण नाही भगवद्गीते मध्ये भगवान सांगतात कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन माणसाला कर्मकार्यामध्ये अधिकार आहे परंतु फलामध्ये नाही त्यामुळे परमेश्वर जसे आपल्याला ठेवेल तसे आपण राहत असताना नेहमी समाधानी राहिलो पाहिजे. जैसी स्थिती आहे तैशा परी तू राहे कौतुक तू पाहे संचिताचे। असे तुकोबांनी म्हटले आहे.

संत दुनियादास महाराज यांच्या समाधीस्थळी दत्तजयंती उत्सव निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संत दुनियादास महाराज यांचे चरित्र लिहिणारे हभप संजय आण्णा काळे महाराज, हभप सचिन आबा लावनीकर महाराज,हभप आप्पासाहेब महाराज म ुळे, अरुण काळे, पंचक्रोशीतील तरूण मंडळी, भाविक मंडळी,गुणीजन मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



---

### हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे शाळा बंद आंदोलन व मोर्चाला जाहीर पाठिंबा

# अधिकारांच्या लढाईत निमंत्रणे दिली जात नाहीत; ज्यांचा जमीर जागा आहे ते स्वतःहून समर्थनासाठी पुढे येतात - शेख अब्दुल रहीम

**छत्रपती संभाजीनगर –** टीईटी सक्ती व इतर प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने ५ डिसेंबर २०२५ रोजी घोषित करण्यात आलेल्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनास हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे जाहीर आणि सक्रिय पाठिंबा देण्यात आला आहे. या आंदोलनात सर्व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षणप्रेमी यांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी केले. शेख अब्दुल रहीम यांनी सांगितले की, अन्यायकारक निर्णयांमुळे शिक्षण क्षेत्र ढवळून निघाले असून शिक्षक मोठ्या संख्येने अतिरिक्त होत आहेत, जिल्हा परिषद व खासगी अनुदानित शाळा बंद पडत आहेत. त्यामुळे लोकशाही मार्गाने आंदोलन करणे आवश्यक बनले आहे. सर्वांनी निर्भयपणे सहभागी होऊन मोर्चाला १०० टक्के यशस्वी करावे, अशी विनंतीही त्यांनी केली.

**मुख्य मागण्या** शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्ण अट रद्द करावी.

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयातील अन्यायकारक तरतुदी व त्याअन्वये केलेले समायोजन रद्द करावे.

विद्यार्थी संख्या २० पटांच्या आतील शाळा बंद करण्याचे धोरण रद्द करावे.

शिक्षक अतिरिक्त होण्यास कारणीभूत धोरणे पुनर्विचार करून रद्द करावीत.

जिल्हा परिषद व खासगी अनुदानित शाळा बंद होऊ नयेत म्हणून तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात.

राज्यातील शिक्षकांना १०, २० व ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करावी.

शिक्षकांची सर्व थकीत वेतन देयके



तात्काळ मंजूर करावीत.

वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके प्रलंबित न ठेवता तत्काळ दिली जावीत.

# विभागस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत जेइएस चे यश




**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १८ नोव्हेंबर २०२५ रोजी विभागस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत जे ई एस महाविद्यालय जालना च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली.

जालना जिल्हा तील जेइएसचे यशस्वी खेळाडू प्रथम क्रमांक आलेले व राज्यस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू १) कु.तेजल भागडे वय अंडर -१९, वजन गट -६३ज्ञस पहिला क्रमांक या विद्यार्थ्यानिचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना पर्यवेक्षक डॉ. सुमन बिक्कड व प्रा. डी एम धनवे, क्रीडा शिक्षक प्रा.राहुल सारस्वत राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. राजेंद्र सोनवणे आदींनी अभिनंदन केले आहे.

### मूल्यवर्धन प्रशिक्षण कार्यशाळेचा तिसरा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण

# मूल्यवर्धन काळाची गरज-जगत घुगे

**जालना । प्रतिनिधी -** सेलगाव (ता. बदनापूर) येथील अण्णासाहेब दत्ताभाऊ पाथ्रीकर विद्यालयात शिक्षकांसाठी आयोजित तालुकास्तरीय मूल्यवर्धन प्रशिक्षण कार्यशाळेचा तिसरा टप्पा बुधवार दि. ३ डिसेंबर रोजी निरोप सम ारंभाने पूर्ण झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक जगत घुगे हे होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, आजच्या काळात फक्त शिक्षण पुरेसे नाही, तर मुलांमध्ये संस्कार, मूल्ये आणि चारित्र्य विकास घडवणे अत्यंत आवश्यक आहे. मूल्यवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाने त्याला लोकचळवळ बनवण्याची जबाबदारी घ्यावी. शिक्षकांसाठी आयोजित या कार्यशाळेत अध्यापन कौशल्य, मूल्याधिष्ठित शिक्षण, संवाद कौशल्य आणि वर्गव्यवस्थापन या विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. सहभागी शिक्षकांनी कार्यशाळेमुळे अध्यापनात नवीन दृष्टीकोन लाभल्याची भावना व्यक्त केली. यावेळी चिखली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विनोदकुम ार पांडे, सायगाव येथील आदर्श विद्यालयाचे राजाभाऊ मगर, उजैनपुरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे के. आर. डंबाळे, माळेगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे महेश कऱ्हाळे, देवगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे कैलास चौथे, एकता नगर शाळेचे ए. के. वनवे, भवानीवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे गणेश चाटे यांच्यासह बालाजी मदन, परमेश्वर कठोरे, सौ. कल्पना पाटील आणि सौ. मिरा जगदाळे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे सुलभक मार्गदर्शक म्हणून म्हणून जगत घुगे यांनी जबाबदारी पार पाडली आणि विविध उपक्रम संबधित सहभागी शिक्षकांच्या सहकार्याने करून घेतले. या कार्यशाळेला तालुक्यातील शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.